# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र.७०५/२०१५

सर्व शिक्षकेतर सेवकांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ ची स्थिती दर्शविणारी तात्पुरती (Provisional) जेष्ठतासूची (Seniority List) जाहीर करण्यात येत आहे. विद्यापीठ सेवकांसाठी लागू असलेले महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संबंधित महाविद्यालये प्रमाणसंहिता नियम, १९८४ महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २० मे २०१० च्या शासन निर्णयानुसार रद्द करण्यात आलेले असून त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी विद्यापीठ शिक्षकेतर सेवकांसाठी लागू करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने मा. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. मः/१४/२४०१११ नुसार व शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र. २८४/१२, दिनांक २१/१०/२०११ नुसार विद्यापीठ सेवकांची सेवाज्येष्ठता ही संबंधित नियम, तरतुदी व अटींच्या अधीन राहून त्या त्या संवर्गातील सलग सेवेच्या दिनांकापासून धरण्यात येत आहे. दिनांक २०/०५/२०१० पूर्वी सरळ सेवेने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेले सेवक हे दिनांक २० मे, २०१० नंतर सरळ सेवेने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या सेवकास सेवाज्येष्ठ राहणार आहे.

सदर यादी www.unipune.ac.in. या संकेतस्थळावर पाहावयास मिळेल. सर्व सेवकांनी जेष्ठता सूचीतील आपले नाव व त्या अनुषंगाने केलेल्या नोंदी पाहून दुपारी ४.०० ते ५.०० या वेळेत प्रशासन विभागात असलेल्या आपआपल्या नावापुढे स्वाक्षरी करावी. सदर तात्पुरत्या जेष्ठतासूची संबंधी काही आक्षेप असल्यास सदर परिपत्रक प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांपर्यंत सर्व पुराव्यांसह मा. विभागप्रमुखांमार्फत, प्रशासन शिक्षकेतर विभागाकडे लेखी कळवावेत. सदर मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच तात्पुरत्या जेष्ठतासूचीवर स्वाक्षरी न केलेल्या सेवकांचे जेष्ठतासूची संबंधी काहीही आक्षेप नाहीत असे समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे-४११ ००७ )
जा.क्र. : एएन/ 2685 )
दिनांक : 24 JUN 2015 )

( डॉ. नरेंद्र मा. कडू )
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

} यांना विनंती की सदर परिपत्रक त्यांच्या विभागात काम करणा-या सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणावे.